मनोहर अनंत पेडणेकर वि.

जयकुमार नरसिंगराव देसाई

## निशाणी क्रमांक १०३ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.२५ हीचे वारसांना प्रतिवादी म्हणून सामील करून घेणेची परवानगी मागितलेली आहे.

२. वादीच्या मते, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.२५ ललीता लवू भाईडकर ही दि.०१/०१/२०२४ रोजी मयत झाली आहे. मयत प्रतिवादीचे वारस मुदतीत दाखल करणे आवश्यक आहेत. प्रतिवादी क्र.२५ यांना समृध्दी नितीन पेडणेकर (मुलगी) हेच नजीकचे व कायदेशीर वारस आहे. त्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्याकामी प्रतिवादी म्हणून सामील करणेची परवानगी वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे.

३. प्रतिवादी क्र. ११ ते १४ यांनी नि.१०८ कडे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. अर्जात नमुद विलंबाचे कारण संयुक्तीक व योग्य नाही. अर्ज कायदयाने चालणारा नाही. अर्जामध्ये वादी क्र.१० हे कोणत्या आजाराने आजारी होती याबाबत खुलासा केलेला नाही. तसेच त्याबाबत वैदयकीय दाखला दाखल केलेला नाही. वादी यांनी न्यायालयाचा बहुमूल्य वेळ वाया घालवलेला असलेने रक्कम रुपये १०,०००/- इतका खर्च आकारणेची विनंती केलेली आहे.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा धडेवाटप व ठरावाकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ वादीने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. तसेच वादी यांनी नि.१००

सोबत मयत प्रतिवादी क्र.२५ हीच्या मृत्यूप्रमाणपत्राची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी तसेच, नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे मयत प्रतिवादी क्र.२५ हीचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. वादीने सरनाम्यामध्ये निशाणी क्र.१०३ वरील अर्जाप्रमाणे दुरूस्ती करणेची परवानगी देण्यात येते.

३. वादी यांनी सदर आदेशाप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेची आहे व दाव्याची दुरूस्त प्रत पुढील तारखेस वा तत्पूर्वी दाखल करावी

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.11.20 18:04:31 +0530

दिनांक– २०/११/२०२५ (श्रीमती आर.जी.कुंभार)

ठिकाण– सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

सावंतवाडी.